# मुंबई विद्यापीठ

## उमेदवारांसाठी सुचना

(१) मतदान केंद्रावर प्रतिनिधींची नेमणूक करण्यासाठी प्रतिनिधी हा मतदार असणे आवश्यक आहे. प्रतिनिधी हा त्याच मतदान केंद्रातील मतदार असेल तर उमेदवाराला त्याच दिवशी तसेच प्रतिनिधी हा इतर मतदान केंद्रातील मतदार असेल तर उमेदवाराला मतदानाच्या ६ दिवस अगोदर दोन फोटोसह नमुना (अ) मध्ये मतदान केंद्रावर निवडणूक अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा लागेल.

(२) प्रत्येक मतदान प्रतिनिधीला नमुना (ब) प्रमाणे ओळखपत्र देण्यात येईल.

(३) मतदान केंद्राच्या परिसरापासुन १०० मीटर अंतराच्या आत कोणत्याही संस्था/उमेदवार/प्रतिनिधी इत्यादींना मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची भिंती पत्रके, झेंडे अथवा बॅनर्स मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी लावण्यास बंदी असेल. तसेच लावलेले बॅनर्स स्वतःहून काढावे लागतील. विद्यापीठ निवडणूक विभागाच्या निवडणुकीसंबधीत वाहनाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही वाहनास मतदान केंद्राच्या परिसरात प्रवेश करता येणार नाही.

(४) मतदान केंद्राच्या परिसरात फक्त उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, मतदार आणि निवडणुकसंबधी कर्मचारी/अधिकारी यांनाच प्रवेश असेल.

(५) बोगस मतदार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(६) सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(७) मतदार केंद्रावर निवडणूकीसंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास निवडणूक अधिकारी परिनियम व कायद्याच्या आधारे कुलसचिव-तथा-निवडणूक निर्णय अधिकारी आणि कुलगुरुंच्या सल्ल्याने योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम असेल.

(८) सर्व उमेदवारांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम मुद्दा क्र. १२ व १५ प्रमाणे मतदान/मतपत्रिका छाननी व मतमोजणी वेळी काळजी घ्यावी.

(९) मतपत्रिका छाननी आणि मतमोजणी वेळी उमेदवार अथवा उमेदवाराचा प्रतिनिधी पैकी एका वेळी एकच उपस्थित राहू शकेल.

(१०) सकाळी मतदान सुरू करण्याआधी मतपेट्या दाखवून सिलबंद करताना व मतदान झाल्यावर सिलबंद करतांना उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधी समोर सीलबंद करून त्यावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी. उमेदवार/प्रतिनिधी उपस्थित नसल्यास निवडणूकीच्या कामावर असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पाडण्यात यावी. व त्यावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

स्वाक्षरित/-

(डॉ. दिनेश कांबळे)
**कुलसचिव**
**तथा निवडणूक निर्णय अधिकारी**

Scanned by CamScanner